
हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या कथा

# मंत्र-तंत्र

अनुवाद

विद्या सहस्रबुद्धे



एकः सूते सकलम्
नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



नेहरू बाल पुस्तकालय

# मंत्र-तंत्र

## हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या कथा

अनुवाद : **विद्या सहस्रबुद्धे**

चित्रे : **प्रशांत मुखर्जी**



ISBN 81-237-3532-4

2001 (*शके* 1923)
मूळ © डॉ. मुकुंद द्विवेदी, 1993
**रु. 10.00**

Mantra-Tantra : Hazariprasad Dwivedi Ki Kahaniyan *(Marathi)*

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली 110 016 यांनी प्रकाशित केले.






# धनवृष्टी

कोण्या एका गावात एक ब्राह्मण राहत असे. त्याला एक जादूचा मंत्र माहीत होता. त्या मंत्राची खुबी अशी होती, की ज्यावेळी एक विशिष्ट ग्रहयोग असेल त्यावेळी त्या मंत्राचा वापर केला तर आकाशातून अनेक प्रकारची रत्नं आणि पैशांचा पाऊस पडत असे. एक अतिशय बुद्धिमान विद्यार्थी त्या ब्राह्मणाचा शिष्य होता. एके दिवशी काही कामानिमित्त ब्राह्मण त्या विद्यार्थ्यासोबत प्रवासाला निघाला. काही अंतर पार केल्यावर ते एका घनदाट जंगलात येऊन पोहोचले. त्या जंगलात पाचशे दरोडेखोर राहत असत. वाटसरू दृष्टीला पडताच ते त्यांच्या चीजवस्तूंची लूट करीत. ब्राह्मण आणि विद्यार्थ्याचीही तीच गत झाली. दरोडेखोरांनी त्यांना पकडलं आणि बांधून ठेवलं.

वाटसरूंजवळ नेहमीच पैसाअडका नसे. पण तरीही दरोडेखोर त्यांना सोडत नसत. ते एकाला बांधून ठेवून दुसऱ्याला सांगत, "जा, शक्य असेल तर पैसे आण आणि याला सोडवून घेऊन जा." जर कधी पितापुत्रांना पकडलं तर मुलाला बांधून ठेवत आणि बापाला पैसे आणायला पाठवत. जर आई आणि मुलीला पकडलं तर मुलीला ठेवून घेऊन आईला पैसे आणायला सांगत. दोन भावांना पकडलं तर लहान भावाला ठेवून घेऊन मोठ्याला पाठवत आणि गुरुशिष्यांना पकडलं तर गुरुला ठेवून






घेत आणि शिष्याला पाठवीत. याचप्रमाणे त्यांनी ब्राह्मणाला पकडून ठेवलं आणि शिष्याला पैसे आणायला पाठवून दिलं.

जाताना शिष्य गुरुना प्रणाम करून त्यांना सावध करीत म्हणाला, "मी एक-दोन दिवसात परत येईन. आपण घाबरू नका. पण लक्षात ठेवा—आज धनवृष्टीचा योग आहे. भीतीपोटी किंवा त्रासामुळे तुम्ही धनवृष्टी करण्याचा प्रयत्न मात्र करू नका. जर असं केलंत तर तुम्ही स्वतः तर मरालच, पण हे पाचशे दरोडेखोर सुद्धा मरण पावतील." एवढं सांगून शिष्य पैशांची व्यवस्था करण्यासाठी घराकडे निघाला.



सायंकाळी पूर्व दिशेला चंद्रोदय होऊ लागला. ब्राह्मणाच्या लक्षात आलं की नक्षत्रयोग जवळ येत आहे. त्यानं विचार केला, 'हे दरोडेखोर धनप्राप्तीसाठी आपल्याला इतका त्रास देत आहेत ना? आता धनवृष्टीचा योग येऊन ठेपला आहे. मी इतका त्रास कशाला सोसू? मंत्राच्या बळावर पैशाचा पाऊस पाडून यांना पैसे देऊन निघून गेलो तर काय हरकत आहे?' त्यानं दरोडेखोरांना विचारलं, "अरे बाबांनो, तुम्ही मला का बरं डांबून ठेवलं आहे?" सांगायला नकोच, की त्यांनी उत्तर दिलं, "पैशासाठी!" ब्राह्मण म्हणाला, "जर हेच कारण असेल तर मला बंधनातून मोकळं करा. मला स्नान करून नवी वस्त्रं परिधान करू द्या. चंदनाचा टिळा लावून फुलांचा हार घालू द्या." दरोडेखोरांनी त्याच्या म्हणण्याप्रमाणे केलं. ब्राह्मणानं मंत्राचा उच्चार करून आकाशाकडे नजर टाकली न टाकली तोच आकाशातून वेगवेगळी रत्नं, पैसे यांची जशी काही झडच लागली. त्यापैकी जमेल तेवढा पैसा गोळा करून आपल्या गाठोड्यात बांधून दरोडेखोर निघून जाऊ लागले. ब्राह्मणही त्यांच्या




मागोमाग निघाला. थोडं दूरवर गेल्यावर अचानक आणखी पाचशे दरोडेखोर त्यांच्या वाटेत आले आणि त्यांनी पहिल्या दरोडेखोरांचा मार्ग रोखला. त्यांनी विचारले, ''आमची वाट का अडवता?'' नव्या दरोडेखोरांनी उत्तर दिले, ''धनासाठी.'' तेव्हा पहिले दरोडेखोर म्हणाले, ''एवढंच ना? मग ते या ब्राह्मणाकडे मागा. त्यानं आकाशाकडे नजर टाकण्याचा अवकाश, की बघता-बघता पैशाचा पाऊस पडू लागतो. याच्यामुळेच तर आम्हाला हा धनलाभ झाला आहे.''


नव्या दरोडेखोरांनी पहिल्या दरोडेखोरांना सोडून ब्राह्मणालाच पकडलं. ते म्हणाले, ''बाबाजी, आम्हालाही धन मिळवून द्या.'' ब्राह्मण म्हणाला, ''ठीक आहे. तुमची जर हीच इच्छा असेल तर धनवृष्टीचा योग आता वर्षभरानंतर येईल. वर्षभर थांबा. तो योग आला की पैशाचा पाऊस पाडून तुम्हालाही पैसे मिळवून देईन.'' दरोडेखोर रागावून म्हणाले, ''काय रे दुष्ट ब्राह्मणा, त्या दरोडेखोरांसाठी आताच पैशाचा पाऊस पाडलास आणि आमच्यासाठी मात्र एक वर्षानंतर?'' त्यांनी ताबडतोब ब्राह्मणाला मारून रस्त्यावर फेकून दिलं आणि पाठलाग करून पहिल्या दरोडेखोरांनाही पकडलं. मग काय विचारता! दोन्ही टोळ्यात भयंकर युद्ध सुरू झालं. कितीजण मरण पावले, काहीजण बचावले. जे जगले वाचले त्यांच्यात पुन्हा हाणामारी झाली. होता होता शेवटी फक्त दोघेजण शिल्लक राहिले. बाकीचे सगळे कापाकापीत मरून गेले.

उरलेले दोघेजण सारी रत्नं आणि धन घेऊन जाता जाता एका गावापाशी आले. तिथे त्यांनी एका झाडाखाली सारं धन पुरून ठेवलं. त्यांच्यापैकी एकजण झाडावर चढून हाती तलवार घेऊन पहारा देऊ लागला आणि दुसरा जेवणाची व्यवस्था

करण्यासाठी गावात गेला. पहारा देणाऱ्यानं विचार केला, की दुसरा जर परत आला तर या धनाचे दोन वाटे करावे लागतील. तो तलवारीच्या मुठीवर हात ठेवून दुसरा परत येण्याची वाट पाहू लागला. जो गावात भात आणण्यासाठी गेला होता त्यानंही विचार केला की 'जर पहिला जिवंत राहिला तर तो धनाचा अर्धा वाटा घेईल. जर मी या भातात विष कालवून त्याला खाऊ घातलं तर तो भात खाल्ल्याबरोबर मरून पडेल आणि मग सारी संपत्ती माझीच!' असा विचार करून त्यानं स्वतः अर्धा भात खाल्ला आणि उरलेल्या भातात विष मिसळून घेऊन गेला. पहिला माणूस त्याची वाट पाहत तयारीतच होता. दुसरा येताक्षणीच त्यानं तलवारीनं त्याचे दोन तुकडे केले आणि त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावली. पण नंतर विषारी भात खाल्ल्यामुळे तोही मरण पावला.

इकडे गुरुंची सुटका करण्यासाठी शिष्य एक-दोन दिवसांनंतर तिथे येऊन पोहोचला. येऊन पाहतो तर काय, गुरुंचा पत्ता नाही आणि सगळीकडे रत्नांचा, पैशाचा खच पडलेला! त्यानं ओळखलं की गुरुंनी त्याचं सांगणं ऐकलं नाही. धनवृष्टी केल्यानंतर इतरांबरोबर त्यांचाही नाश झाला आहे.





# नवस

एकदा एका राजाला मुलगा झाला. लहान वयातच राजकुमारानं अनेक विद्या आत्मसात् केल्या. त्या काळी काशीचे रहिवासी सणासुदीच्या दिवशी अगदी उत्साहानं, थाटामाटात देवी-देवतांची पूजा करीत. त्यांच्या पूजा-साहित्यात फुलं, अक्षता तर असतच, पण त्याचबरोबर बकरी, बोकड, डुक्कर, कोंबडं—असा एखादा प्राणी मारून त्याच्या रक्तामांसाचा नैवेद्यही देवाला दाखवला जात असे. या हत्या पाहून राजकुमाराला फार वाईट वाटत असे. तो विचार करी, 'देवाची पूजा करण्यासाठी लोक अनेक निरपराध प्राण्यांना ठार मारतात. म्हणजे धर्माऐवजी अधर्माच्याच मार्गानं जातात. मी जेव्हा राजा होईन तेव्हा ही प्रथा बंद करून टाकीन. पण ही गोष्ट अशा काही युक्तीनं केली पाहिजे की लोकांना वाईट वाटू नये आणि ही प्रथा सुद्धा नष्ट होईल.'

काही दिवस लोटले. एक दिवस राजकुमार रथावर आरूढ होऊन नगरीबाहेर फिरायला गेला होता. वाटेत त्यानं पाहिलं की एका भल्यामोठ्या वडाच्या झाडाखाली खूप लोक जमले आहेत. लोकांची अशी समजूत होती त्या वडाच्या झाडात देव आहे. अगदी जागृत आहे हा देव! त्याची मनोभावे पूजा करून आपली इच्छा त्याला सांगितली, की ती नक्कीच पूर्ण होते. त्यामुळे लोक बोकड, बकरी वगैरे कापून देवाला




नवस बोलतात आणि आपापल्या इच्छेप्रमाणे मुलगा-मुलगी इत्यादी मागून घेतात. राजकुमार रथातून खाली उतरला. झाडाखाली जाऊन इतर लोक करत होते त्याप्रमाणे त्यानं सुद्धा धूप-दीप दाखवून, पूजा केली. नंतर झाडाला नमस्कार करून, प्रदक्षिणा घालून तो निघून गेला. त्यानंतर दर महिन्याला त्या ठिकाणी येऊन पूजा करण्याचा नेम त्यानं चालूच ठेवला.


काही वर्षांनंतर राजा मरण पावला, राजकुमार गादीवर बसला. आपल्या कुवतीप्रमाणे, न्यायानं तो राज्यकारभार पाहू लागला. पण त्याच्या मनातून ही गोष्ट जाता जाईना की प्राणीहत्या करून पूजा करण्याची पद्धत आपल्या राज्यातून हद्दपार केली पाहिजे. एक दिवस प्रधान आणि इतर अधिकाऱ्यांना बोलावून तो म्हणाला, "तुम्हाला माहीत आहे की हे राज्य मी कशा प्रकारे मिळवलं आहे?" ते म्हणाले, "नाही महाराज, आम्हाला काहीच माहीत नाही. पण एवढं तर सगळ्यांनाच समजतं की राजपुत्रच राजा होणार!"

राजा म्हणाला, "हं, हे तर आहेच! पण आणखीही एक कारण आहे. तुम्ही कदाचित पाहिलं असेल की अधूनमधून मी त्या वडाच्या देवाला जात असे आणि हात जोडून नमस्कार करीत असे, पूजा करीत असे." सर्वजण म्हणाले, "हो, हो महाराज, पाहिलं आहे आम्ही." राजा म्हणाला, "मी त्याच वेळी देवाला नवस बोललो होतो, की राज्य मिळाल्यावर मी त्याची पूजा करीन. त्या देवाच्या कृपानंच मला राज्य मिळालं आहे. आता मला त्याची पूजा करावी लागेल. पूजेची तयारी करा."

ते लोक म्हणाले, "सांगा महाराज, काय-काय तयारी करायची?"



राजा म्हणाला, "मी असा नवस बोललो आहे की राज्यात जितके लोक ढोंगी आहेत—जे प्राण्यांची हत्या करतात, खोटं बोलतात, चोरी किंवा तशीच काही पापं करतात, त्यांच्या रक्तामांसाचा आणि काळजाचा नैवेद्य दाखवून मी देवाची पूजा करीन. नगरात दवंडी पिटून



घोषणा करा की महाराजांनी युवराज असताना वडाच्या देवाला नवस केला होता की ते जेव्हा राजे होतील तेव्हा राज्यातले जे लोक प्राण्यांची हत्या करतात, चोरी करतात, खोटं बोलतात किंवा तशीच वाईट-साईट कामं करतात अशा एक हजार माणसांच्या रक्तामांसाचा आणि काळजाचा नैवेद्य देवाला दाखवून त्याची पूजा करतील. अशा प्रकारे पूजा करून महाराज आपला नवस फेडणार आहेत.''

राजाच्या आदेशाप्रमाणे मंत्र्यांनी दवंडी पिटवली. त्याचा परिणाम असा झाला की राजाला आपला नवस कधीच फेडता आला नाही. (अर्थात् निरपराध प्राण्यांच्या हत्येची प्रथा कायमची बंद झाली.)




# बदला

काशीच्या रस्त्यावरून एक बैलगाडी चालली होती. गाडीत फक्त दोनच माणसं होती— गाडीवान आणि गाडीचा मालक. मालकाच्या वेशभूषेवरूनच लक्षात येत होतं की हे कुणी मोठे शेठजी—व्यापारी आहेत म्हणून! त्यांचं नाव होतं पांडूशेठ.

थोड्या दिवसांपूर्वीच भरपूर पाऊस झाला होता. चिखलामुळे रस्ता निसरडा झाला होता. बैलांना गाडी ओढायला फार त्रास होत होता. पण कितीही त्रास झाला तरी गाडी ओढणं भागच होतं त्यांना. त्यांचा विचार कोण करतो? चालता चालता गाडी एका चढाच्या रस्त्यावर आली, त्यामुळे बैलांची चाल मंदावली. ते कसेबसे, हळूहळू पुढे चालले होते. तोच शेठजींना एक संन्यासी दिसला. त्यानं मुंडन केलेलं होतं आणि भगव्या रंगाची वस्त्रं परिधान केली होती. त्या वस्त्रांमुळे त्याचं सारं शरीर झाकून गेलं होतं. चेहरा अतिशय सुंदर, शांत आणि प्रफुल्लित होता. जगाच्या कल्याणासाठी बुद्धदेवांनी जो मार्ग दाखवला त्याचे म्हणजेच बौद्धधर्माचे अनुयायी असत हे संन्यासी. म्हणूनच लोक त्यांना बौद्ध संन्यासी किंवा बौद्ध भिक्षू म्हणत.

ही फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या काळी देशात अनेक बौद्ध संन्यासी असत. या संन्याशाचं नाव होतं श्रमण नारद. संन्याशाला पाहताच शेठजींना त्याच्याविषयी



आदर वाटला. त्यांचा भक्तिभाव जागा झाला. बोलता-बोलता जेव्हा शेठजींना कळलं की संन्यासी सुद्धा काशीलाच निघाला आहे तेव्हा त्यांनी त्याला गाडीत बसण्याची विनंती केली. संन्यासी पायी-पायीच निघाला होता, खूप दमला होता. त्यामुळे शेठजींचे आभार मानून तो त्यांच्या गाडीत बसला. दोघंजण मजेत प्रवास करू लागले.


थोडं अंतर गेल्यावर गाडी एका उतरणीच्या रस्त्याजवळ थोडी थांबली. वाटेत एक दुसरी गाडी दिसली. आरीतून निसटल्यामुळे गाडीचं एक चाक निखळून पडलं होतं. गाडीवान एकटाच होता. खूप वेळ खटपट करूनही बिचारा काहीच करू शकला नव्हता. अगदी घाबरून गेला होता. बरं, ती जागाही नेमकी अशी होती की त्याची गाडी वाटेतून हलवल्याशिवाय दुसरी गाडी पुढे जाऊ शकत नव्हती. गाडी देवल



नावाच्या एका सामान्य शेतकऱ्याची होती. तो गाडीत तांदळाची पोती लादून ती विकण्यासाठी काशीलाच निघाला होता. वाटेतच बिचाऱ्याची अशी अवस्था झाली होती.

जेव्हा शेठजींच्या लक्षात आलं की देवलची गाडी वाटेतून दूर केल्याशिवाय त्यांची गाडी पुढे जाऊ शकणार नाही तेव्हा ते चांगलेच रागावले. त्यांनी आपल्या नोकराला फर्मावलं, "जा—त्याच्या गाडीतली पोती खाली फेकून दे आणि गाडी एका बाजूला ढकलून आपली गाडी पुढे काढ."


देवल त्यांच्या हातापाया पडत दीनवाणेपणानं म्हणाला, "शेठजी, मी लहानसा शेतकरी आहे. खूप गरीब आहे. पावसामुळे सगळा रस्ता चिखलानं भरला आहे. पोती जर खाली पडली तर माझा सगळा तांदूळ खराब होईल. आपण जरा थांबा. मी



3002

काहीतरी करून माझी गाडी या उतारावरून बाजूला करतो आणि तुम्हाला वाट करून देतो.'' शेतकऱ्याची करुण प्रार्थना शेठज़ींना जणू ऐकूच आली नाही., आणखीनच रागवून त्यांनी नोकराला ताकीद दिली, ''अरे पाहत काय राहिलास? मी जे सांगितलं ते कर. चल, त्याची पोती फेकून दे आणि आपली गाडी पुढे काढ.'' नोकरानं शेतकऱ्याच्या गाडीतून पोती खाली फेकून दिली आणि त्याची गाडी एका बाजूला ढकलून स्वतःची गाडी पुढे नेली.

श्रमण नारदांनी गाडीतून उडी मारली आणि ते म्हणाले, ''शेठजी, माफ करा. मी तुमच्याबरोबर येऊ शकत नाही. एरवी मी तुमच्यासोबत आलो असतो, पण आता मात्र नाही. तुम्ही ज्या शेतकऱ्याची गाडी उलथून पुढे निघून चालला आहात त्याच्याशी तुमचं जवळचं नातं आहे. तुमच्या गाडीत मला जागा देऊन तुम्ही माझ्यावर मोठेच उपकार केले आहेत. मी तुमचा ऋणी आहे. तुमचं हे ऋण मला फेडलं पाहिजे. तुमच्याशी जवळचं नातं असलेल्या या शेतकऱ्याला मदतं करून मी या ऋणातून मुक्त होईन. जर मीं त्याच्यासाठी काही करू शकलो, त्याचा काही फायदा करून देऊ



शकलो तर शेठजी, त्याच्यामुळे तुमच्यावरही उपकारच होतील. तुम्ही या शेतकऱ्याचं फार मोठं नुकसान केलं आहे, पण त्यामुळे तुमचंही खूप नुकसान झालं आहे. त्यातून तुम्हाला वाचवण्यासाठी आता आम्हालाच प्रयत्न करावे लागतील.'' शेठजींनी त्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिलं नाही. त्यांची गाडी पुढे निघून गेली.

श्रमण नारद देवलजवळ गेले. दोघांनी मिळून पोती उचलली. त्यातला भिजलेला तांदूळ आणि चांगला तांदूळ वेगवेगळा करून नीटपणे बांधू लागले. गाडी सुद्धा दोघांनी मिळून सरळ केली. पोती वर चढविली. देवलला वाटलं की नक्कीच हा संन्यासी अगदी परोपकारी महापुरुष आहे. म्हणून त्यांचा यथोचित आदरसत्कार करून त्यानं विचारलं, ''महाराज, माझ्या आठवणीप्रमाणे मी तर या शेठजींशी कधी वाईट वागलो नाही. माझ्यामुळे त्यांचं कधी काही नुकसान झालं नाही. तरीही त्यांनी माझ्यावर असा अन्याय का बरं केला?'' नारद म्हणाले, ''अरे बाबा, आता जे तुला भोगावं लागतंय् ती तुझ्या पूर्वीच्या कर्माची फळं आहेत. मनुष्य जे काही पेरील तेच उगवेल.''

गाडी ठीकठाक करून देवल निघाला. नारद त्याच्याबरोबर चालत चालत निघाले. थोडं दूर गेल्यावर बैल एकदम बिथरले. समोर सापासारखी लांब वस्तू पाहून देवल घाबरला. नारदांनी जवळ जाऊन नीट पाहिलं आणि म्हणाले, ''अरे, ही तर एक लांब थैली आहे. हे बघ, याच्यात मोहोरा भरल्या आहेत.'' त्यांच्या लगेच लक्षात आलं की ही तर शेठजींची थैली दिसते. कधी पडली ते शेठजींच्या ध्यानात आलं नसावं. थैली उचलून देवलकडे देत ते म्हणाले, ''जेव्हा काशीला पोचशील तेव्हा शेठजींना शोधून काढ आणि त्यांना ही पिशवी दे. त्यांचं नाव आहे पांडूशेठ आणि त्यांच्या नोकराचं नाव आहे महादत्त. त्यांना सांग की त्यांनी तुझ्यावर जो अन्याय केला त्याचा विचार करू नये. त्यांना म्हणावं की मीही ती गोष्ट विसरून गेलो आहे. देवल, तू सुद्धा शेठजींना त्यांच्या अपराधाबद्दल माफ कर.''

एवढं सांगून नारद निघून गेले. देवलही गाडी घेऊन पुढे निघाला.

काशीला मलिक नावाचा एक व्यापारी होता. त्यांच्याच आडतीत पांडूशेठ व्यवहार करीत असत. त्यामुळे त्या दोघांचे चांगले संबंध होते. जेव्हा पांडूशेठ त्यांच्याकडे गेले तेव्हा मलिक रडत रडत म्हणाला, ''अरे बाबा, मी तर मोठ्याच संकटात सापडलो आहे. मला नाही वाटत की मी यापुढे तुझ्याबरोबर व्यवहार करू शकेन. मी राजवाड्यात खुद्द राजासाठी तांदूळ पाठवायचं वचन दिलं होतं. उद्या सकाळीच मला सगळा तांदूळ पोचवायचा आहे. पण आज माझ्याकडे तांदळाचा एक दाणा सुद्धा शिल्लक नाही. या शहरात एक आणखी बडा व्यापारी आहे. त्याच्याशी माझी नेहमीच

स्पर्धा चालते. राजवाड्यात मी तांदूळ पोहोचवणार या बातमीचा सुगावा लागताच त्यानं शहराच्या आसपासच्या गावांमधून सगळा चांगल्या प्रतीचा तांदूळ चढ्या भावानं खरेदी करून टाकला आहे. मीं आणखी जास्त भाव द्यायला तयार आहे, पण काही उपयोग नाही. आता प्रश्न असा आहे, की उद्या तांदूळ कसा पोहोचवणार? असं वाटू लागलंय् की माझी सारी पत धुळीला मिळणार! माझं काही खरं नाही. देवाच्या कृपेनं उद्यापर्यंत एखादी गाडी तांदूळ जरी मिळाला तरी ठीक आहे, नाहीतर माझी काही धडगत नाही.''

मलिकचं बोलणं ऐकताच पांडूशेठना आपल्या मोहोरांच्या थैलीची आठवण झाली. त्यांनी भराभर गाडीतल्या सगळ्या सामानाची उचकपाचक केली, पण काहीच मिळालं नाही. त्यांना महादत्त नोकराचा संशय आला. त्यांना वाटलं की त्यानंच थैली चोरली



असणार! त्यांनी महादत्ताला कोतवालाच्या ताब्यात दिलं. तो पुन्हा पुन्हा सांगत होता की मी मोहोरांची थैली चोरली नाही, पण शिपाई त्याला सोडायला तयार नव्हते. त्यांनी त्याची यथेच्छ पिटाई सुरू केली. पण जर त्यानं खरोखर चोरी केलीच नव्हती, तर तो कबूल कसा होणार? तो विचार करू लागला—'अरेरे! मी असं काय पाप केलं

की ज्याचं फळ म्हणून माझी ही अशी अवस्था झाली आहे? शेतकरीदादा, शेठजींचं म्हणणं ऐकून मी उगाचच तुला त्रास दिला. मला क्षमा कर.'

शिपाई महादत्ताला मारहाण करीत होते, त्याच वेळी देवल तिथे पोहोचला. पांडूशेठही तिथेच होते. देवलनं मोहोरांची थैली त्यांच्याकडे सोपवीत, ती कशी सापडली वगैरे हकीगत त्यांच्या कानावर घातली. आता महादत्ताला डांबून ठेवणं कोतवालाला शक्यच नव्हतं. त्यानं त्याची सुटका केली. तिथे जास्त न रेंगाळता देवलही निघून गेला.

इकडे मलिकला समजलं की देवलकडे एक गाडी चांगला तांदूळ आहे. त्यानं देवलला चांगला भाव देऊन तांदूळ खरेदी केला, आणि राजवाड्यात पाठवून दिला. अपेक्षेपेक्षा खूपच जास्त भाव मिळाल्याच्या आनंदात देवल आपल्या गावी परत गेला.

पांडूशेठनी जेव्हा पाहिलं की त्यांची हरवलेली थैली सापडली आहे आणि आडतदार मलिकचं संकटही टळलं आहे तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. त्यांना वाटलं—'जर हा शेतकरी आज आला नसता तर माझी मोहोरांची थैली परत मिळाली नसती आणि मलिकचं संकटही टळलं नसतं. मी त्या शेतकऱ्याशी किती वाईट वागलो. त्याला खूप त्रास दिला, पण तो माझ्याशी किती चांगला वागला. मागचं काहीएक त्यानं मनात ठेवलं नाही. किती सज्जन आहे हा! एक सामान्य शेतकरी इतका सज्जन कसा काय होऊ शकतो? बहुधा त्या संन्याश्याच्या सहवासाचाच हा चमत्कार असावा. परिसाशिवाय लोखंडाचं सोनं कसं बरं होईल?' पांडूशेठना त्या संन्याश्याला भेटण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांनी खूप शोध घेतला, पण संन्याशाचा काही पत्ता लागला नाही.

त्या काळी काशीला बौद्ध संन्याश्यांना उतरण्यासाठी मोठमोठे मठ होते. पांडूशेठच्या मनात सहज विचार आला की यापैकी एखाद्या मठात श्रमण नारद सापडू शकतील. मठालाच 'विहार' असंही म्हणतात. एक-दोन विहारांमध्ये शोधल्यानंतर पांडूशेठजींना श्रमण नारद दिसले. त्यांनी नारदांना नमस्कार केला. दोघांनी पुष्कळ गप्पा मारल्या.

बोलता बोलता श्रमण नारद म्हणाले, ''शेठजी, फार काही सांगून तुम्हाला आत्ता समजणार नाही पण मागाहून नक्की समजेल. म्हणून आता एक छोटीशी गोष्ट सांगतो, ती ध्यानात ठेवून वागलात तर तुमचं कल्याण होईल. शेठजी, जेव्हा केव्हा तुम्ही कोणाला दुखवायला जाल तेव्हा पहिल्यांदा स्वतःच्या मनाला प्रश्न विचारा की जर दुसऱ्या कोणी मला असाच त्रास दिला तर मला काय वाटेल? जर बरं वाटलं तर तुम्ही दुसऱ्याला दुखवूच शकणार नाही. आणखी एक गोष्ट स्वतःला विचारा—जर कोणी माझी सेवा केली तर मला बरं वाटेल की नाही? जर बरं वाटणार असेल तर तुम्ही सुद्धा कोणाची सेवा करण्यात मागेपुढे पाहू नका. शेठजी, पेरावं तसं उगवतं.

दुसऱ्याला दुखवलं तर आपण स्वतःच्या दुःखाचं बीज पेरीत असतो. त्याचप्रमाणे दुसऱ्याला सुख दिल्याने स्वतःच्या सुखाचं बीज पेरलं जातं."

काही काळ लोटला. पांडूशेठनं कौशांबीला एक खूप मोठा विहार बांधला. तिथे शेकडो बौद्ध भिक्षूंची राहण्याची सोय केली. दूरदूरचे लोक तिथे विद्या शिकायला येत असत. धार्मिक वातावरणात रमत.

काही वर्षांनंतर आपल्या व्यवसायात, व्यापारात पांडूशेठनी चांगलं नाव कमावलं. एकदा कौशांबीच्या राजानं पांडूशेठना राजवाड्यात बोलावून एक सोन्याचा मुकुट



बनवण्याची आज्ञा दिली. त्यानं शेठजींना सांगितलं की कितीही खर्च आला तरी हरकत नाही, पण रत्नमाणकं जडवून, सुंदर कलाकुसर असलेला सुरेख सोन्याचा मुकुट बनवा.

शेठजींनी थोड्याच दिवसात एक अतिशय सुंदर मुकुट बनवला. मुकुट घेऊन कौशांबीला जाताना त्यांनी आपल्याबरोबर इतरही काही जडजवाहीर घेतलं, कारण वाटेत त्यांना त्याचीही विक्री करता आली असती. मौल्यवान सामान बरोबर असल्यामुळे शेठजींनी वाटेत काही संकट आलं तर खबरदारी म्हणून वीस पंचवीस शिपायांनाही सोबत घेतलं होतं.

कौशांबीच्या वाटेवर एक जागा थोडी धोक्याची होती. तिथे रस्त्याच्या दोन्ही बाजूला डोंगर होते आणि त्यांच्या मधून चिंचोळा रस्ता गेला होता. या जागेजवळ एका छोट्याशा गावात काही दरोडेखोर राहत असत. संधी सापडताच प्रवाश्यांना मारहाण करून त्यांच्याकडची चीजवस्तू ते लुटून नेत. शेठजी जेव्हा त्या ठिकाणी पोहोचले तेव्हा पन्नास साठ दरोडेखोरांनी त्यांना घेरलं. शिपायांनी त्यांच्याशी लढायचा प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही. शेठजींजवळचं सारं काही दरोडेखोरांनी लुटून नेलं. त्यांचं सर्वस्वच जणू हिरावून नेलं. मुकुटाबरोबर नेलेलं जडजवाहीर सुद्धा शिल्लक राहिलं नाही. ते डोक्याला हात लावून बसून राहिले.

शेठजींना मोठाच धक्का बसला पण ते गप्प राहिले. त्यांनी बाहेरून तसं काहीच दाखवलं नाही. त्यांनी विचार केला, 'एकेकाळी मी सुद्धा लोकांवर काही कमी अत्याचार केले नाहीत. किती जणांना त्रास दिला आहे. आज माझ्या लक्षात येत आहे की मी जसं बी पेरलं आहे, त्याचीच ही फळं मला मिळताहेत.' शेठजींना आज कळलं की दुःख कशाला म्हणतात, दुसऱ्याला त्रास दिल्यावर त्याला काय वाटतं. पूर्वी केलेल्या पापांचा त्यांना पश्चात्ताप होऊ लागला. त्या पश्चात्तापाच्या आगीत होरपळून त्यांचं मन स्वच्छ होऊ लागलं. त्यांच्या हृदयाला दयेचा पाझर फुटला. स्वतः दरिद्री झाल्यामुळे त्यांना बरं वाटलं.

कौशांबीकडे जाणाऱ्या ज्या रस्त्यावर दरोडेखोरांनी पांडूशेठची संपत्ती लुबाडली होती, त्याच रस्त्यावरून एक बौद्ध संन्याशी चालला होता. त्याच्याजवळ एक भिक्षापात्र आणि एक छोटंसं गाठोडं होतं. एका रेशमी कापडानं गाठोडं बांधलं होतं. त्या गाठोड्यात काही हस्तलिखित पोथ्या होत्या. रेशमी कापड कुणा एका भक्तानं दिलं होतं. पण त्याच कापडामुळे बिचाऱ्या भिक्षूवर संकट कोसळलं. दरोडेखोरांनी लांबून पाहिलं तेव्हा त्यांना वाटलं की या गाठोड्यात काहीतरी मौल्यवान वस्तू आहे. पण जेव्हा त्यांनी जवळ जाऊन गाठोडं उघडून पाहिलं तेव्हा त्यांना त्यात पोथ्या दिसल्या. निराश होऊन परत जाताना त्यांनी भिक्षूला खूप मारहाण केली.


भिक्षूला इतकी दुखापत झाली होती की तो जागचं हलूच शकत नव्हता. रात्रभर तो तेथेच पडून राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी कसाबसा उठून रस्त्याला लागला. थोडं पुढे गेल्यावर त्याला जंगलातून माणसांचा आरडाओरडा, तलवारींचा खणखणाट ऐकू आला. भिक्षू थांबला. त्याला दिसलं की दरोडेखोर आपापसात लढत आहेत. एक माणूस एकटाच एका बाजूला आहे आणि दुसरीकडे उरलेले सर्वजण. पाहताक्षणीच लक्षात येत होतं की जो माणूस एकटा आहे तो इतरांपेक्षा खूपच बलाढ्य आहे. पण तरीही तो फार काळ तग धरू शकला नाही. त्याला मेल्यासारखा पडलेला पाहून हळूहळू सर्वजण निघून गेले.

दरोडेखोर निघून गेल्यानंतर भिक्षू सावकाश त्या जखमी माणसाजवळ गेला. जवळच्या झऱ्याचं थोडं पाणी आणून त्याच्या तोंडावर, डोळ्यांवर शिंपडलं. थोड्या वेळानं तो शुद्धीवर आला. भिक्षूनं एका मोठ्या झाडाची काही पानं आणून त्यांचा रस त्या माणसाच्या जखमांवर लावला. तरीही तो माणूस पडूनच होता. हळूहळू डोळे उघडून त्यानं भिक्षूकडे पाहिलं आणि म्हणाला, "काल माझ्या साथीदारांबरोबर मी एका भिक्षूला खूप मारलं होतं. तुम्ही तेच तर नाही? मी केलेल्या अत्याचारांच्या बदल्यात उपकार करायला आला आहात? आपण जे पाणी आणलंत त्यानं माझी तहान भागेल ही गोष्ट खरी, पण आता माझा जीव वाचेलसं मला वाटत नाही. मीच माझ्या साथीदारांना लढाईचे डावपेच शिकवले, पण त्या दुष्टांनी मीच शिकवलेल्या विद्येचा प्रयोग माझ्यावर करून मला मारलं."

भिक्षू म्हणाला, "अरे बाबा, म्हणतात ना—पेरावं तसं उगवतं. अगदी खरं आहे हे! तू तुझ्या दोस्तांना मारामारी, वाटमारी वगैरे शिकवलंस. तेच शिकून त्यांनी तुला मारलं. तू जर त्यांना दयेची शिकवण दिली असतीस तर त्यांनीही तुझ्यावर दयाच दाखवली असती."

दरोडेखोरानं आजवर ज्या काही वाईट गोष्टी केल्या होत्या त्या त्याला एक-एक करून आठवू लागल्या. काकुळतीला येऊन तो म्हणाला, "मला माझ्या कृत्यांचं प्रायश्चित्त घ्यावंच लागेल. मी खूप पापं केली आहेत. महाराज, मी आपल्याला सगळी कहाणी सांगतो—काहीही लपवून न ठेवता. पांडूशेठ नावाचे एक बडे व्यापारी आहेत. सर्वजण त्यांना ओळखतात. मी त्यांच्याकडे कामाला होतो. माझं नाव महादत्त. शेठजी मला जे जे काम सांगत असत, ते प्रत्येक काम माझी स्वतःची इच्छा नसली तरी केवळ त्यांचा नोकर होतो म्हणून मी करीत असे. एक दिवस त्यांनी माझा काही दोष नसतानाही चोरीचा आरोप ठेवून मला कोतवालाच्या हाती दिलं. त्यांच्यासमोर शिपायांनी मला इतका काही चोप दिला की काही विचारू नका! मी तर अगदी

मरायलाच टेकलो होतो. जेव्हा खरी गोष्ट उघडकीला आली तेव्हा सगळ्यांना समजलं की मी चोर नाही. मग कोतवालानं माझी सुटका केली. मला शेठजींचा खूप राग आला. त्यांच्याशी काही न बोलता मी तिथून निघालो. नंतर मी एका दरोडेखोरांच्या टोळीत सामील झालो. थोड्याच दिवसात मी त्यांचा सरदारही झालो. एक दिवस आम्हाला खबर मिळाली की पांडूशेठ एक मौल्यवान मुकुट आणि किमती जडजवाहीर घेऊन कौशांबीला निघाले आहेत. ताबडतोब मी माझ्या टोळीसह जाऊन त्यांच्याजवळ जे काही होतं ते लुटून आणलं. कृपया आपण त्यांच्याकडे जा आणि त्यांना सांगा की काही कारण नसतांना त्यांनी माझ्यावर जो अन्याय केला होता त्याचा बदला घेण्याची इच्छा माझ्या मनात खूप दिवसांपासून होती. पण आज माझं मन एकदम स्वच्छ आहे. मी मागचं सारं काही विसरून गेलो आहे. आपल्या सामानाची लूट करून मी जो गुन्हा केला त्याबद्दल आपली क्षमा मागतो. माझ्यावर दया करा, मला माफ करा."



“बाबाजी, मी जेव्हा शेठजींचा नोकर होतो, तेव्हा त्यांनाच आदर्श मानीत होतो. त्यांचं हृदय अगदी फत्तरासारखं कठोर होतं त्यावेळी त्यांचं पाहून मी सुद्धा त्यांच्यासारखा बनलो. पण आता असं ऐकतो की शेठजी पूर्वीसारखे राहिले नाहीत. आता ते दयाळू, परोपकारी झाले आहेत. मी मात्र काही फारसं चांगलं करू शकलो नाही. बाबाजी, आपण शक्य तेवढ्या लवकर शेठजींकडे जा. त्यांना सांगा की त्यांचा मुकुट आणि सारं जडजवाहीर या जवळच्या गुहेत, मातीत पुरून ठेवलं आहे. मी आणि माझे दोन साथीदार यांच्याशिवाय कुणालाच त्याच्याविषयी माहिती नाही. ते दोन साथीदार तर आता मरून गेले. शेठजींना म्हणावं की शक्य तेवढ्या लवकर येऊन सगळ्या वस्तू तेथून घेऊन जा.”

बोलता-बोलता महादत्ताची वाचा बसली. तो पुढे काहीच बोलू शकला नाही. दुसऱ्याच क्षणी संन्याश्याच्या मांडीवर डोकं ठेवून तो मरण पावला. तो संन्यासी म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसून आपले श्रमण नारदच होते. त्यांनी कौशांबीला जाऊन सारी हकीगत शेठजींच्या कानावर घातली. शेठजींना महादत्ताविषयी ऐकून फार फार वाईट वाटलं. नंतर बरीच कुमक बरोबर घेऊन ते गुहेत गेले, आणि मुकुट, जडजवाहीर वगैरे घेऊन परत आले. पुन्हा एकदा त्यांनी व्यापारात जम बसवला. त्यांचा जो काही नफा होत असे त्यातला बराचसा हिस्सा ते वेगवेगळ्या चांगल्या कामांसाठी, समाजासाठी खर्च करू लागले.

असं म्हणतात, की वयोमानानुसार जेव्हा शेठजींचा मृत्युकाळ जवळ आला तेव्हा मृत्युशय्येवर असताना त्यांनी आपल्या मुलांबाळांना जवळ बोलावून सांगितलं, “जो इतरांना दुःख देतो, तो स्वतःलाच दुःख देतो आणि जो दुसऱ्याचं भलं करतो तो खरं म्हणजे स्वतःचंच भलं करतो!”



# मोठा कोण?

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. काशीमध्ये एक राजा राज्य करीत होता. त्याचा स्वभाव आणि त्याची शिकवण दोन्ही फार चांगलं होतं, तो प्रजेला पोटच्या मुलाप्रमाणेच वागवीत असे. कोणताही निर्णय पक्षपातीपणानं न घेता न्यायाची बाजू घेत असे. रागवून किंवा फायद्याचा विचार करून कोणतीही गोष्ट करीत नसे. त्याच्या अशा वागण्यामुळे त्याचे मंत्री सुद्धा चांगलेच वागत. कधी कोणावर अन्याय करीत नसत. त्यामुळे प्रजा अगदी समाधानी होती. राज्यात कधीही कोणी कोणावर खोटेनाटे खटले भरत नसे. दरबारात खटले येतच नसत. दरबारातले विद्वान दिवसभर वाट पाहून, काही काम नाही असं पाहून संध्याकाळी परत जात. न्यायासनाला काहीच काम उरत नसे. अशा प्रकारे राजाचं राज्य अगदी सुखासमाधानानं, काही गडबड घोटाळा न होता छान चाललं होतं. सगळे लोक राजाचा जयजयकार करीत, त्याचं गुणगान करीत.



एक दिवस राजानं विचार केला–राज्य तरं अगदी छान चाललं आहे, प्रजा सुखी आहे, सगळे माझं गुणगान करीत आहेत. पण माझ्यात काही दोष आहे का हे मला जाणून घेतलं पाहिजे. जर दोष लक्षात आला तर तो दूर करता येईल. राजानं पहिल्यांदा राजवाड्यातल्या लोकांना बोलावून विचारलं, "जर तुम्हाला माझ्यात काही दोष दिसत असेल तर मला स्पष्टपणे सांगा." पण दोष दाखवण्याऐवजी सर्वजण त्याचं गुणगानच करू लागले. राजाला वाटलं की आपल्याला घाबरून हे लोक दोष सांगत नाहीयेत. ठीक आहे, बाकीच्या लोकांकडून काढून घेता येईल. मग राजा राजवाड्यातल्या, शहरातल्या, इतकंच नव्हे तर साऱ्या देशातल्या एकेका माणसाला स्वतःच्या दोषांबद्दल विचारू लागला. पण कोणीही त्याचा एकही दोष सांगितला नाही.

राजाला वाटलं की आपल्याला घाबरूनच हे लोक दोष सांगत नाहीत. मग त्यानं प्रधानाच्या हाती राज्यकारभार सोपवला आणि वेष बदलून तो एका रथातून राज्यात फेरफटका मारण्यास निघाला. फिरत-फिरत तो राज्याच्या सीमेपर्यंत गेला आणि त्यानं खूप विचारपूस केली पण कोणीही त्याच्या दोषांबद्दल बोललं नाही, उलट त्यांनी त्याचं गुणगानच केलं. तेव्हा त्यानं सारथ्याला रथ राजवाड्याकडे परत नेण्याची आज्ञा केली. सारथी रथ वळवून माघारी निघाला.

इकडे कोशल देशाचा राजा सुद्धा अगदी याच प्रकारे स्वतःचे दोष शोधण्यासाठी भटकत होता. तो अगदी धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्याला सुद्धा स्वतःमध्ये दोष आढळून आला नाही म्हणून तोही आपल्या राजधानीकडे परत जात होता. योगायोगानं दोन्ही राजांचे रथ वेगवेगळ्या दिशांनी येऊन एका उतरणीच्या रस्त्यावर समोरासमोर उभे ठाकले. बाजूनं जाण्यासाठी अजिबात रस्ता नव्हता. दोन्हीपैकी एक तरी रथ मागे नेण्यावाचून काही उपाय नव्हता. कोशलराजाच्या सारथ्यानं काशीराजाच्या सारथ्याला म्हटलं, "तू आपला रथ मागे घे." त्यानं उत्तर दिलं, "तूच आपला रथ उलटा फिरव. माझ्या रथात काशीचे राजे आहेत." कोशलराजाच्या सारथ्यानं म्हटलं, "माझ्या रथात कोशलराजे आहेत. तूच आपला रथ मागे घे." काशीराजाच्या सारथ्यानं विचार केला 'बरोबर आहे, हा सुद्धा एक राजा आहे. आता कोणी रथ मागे घ्यावा बरं? ठीक आहे, जो वयानं लहान असेल त्यानं रथ मागे घेऊन दुसऱ्याला वाट देणं योग्य होईल.' तो म्हणाला, "तुझ्या राजाचं वय काय आहे?" सारथ्याच्या उत्तरावरून समजलं की दोन्ही राजे अगदी सारख्याच वयाचे आहेत. मग एक-एक करून राज्य, धनसंपत्ती, सैन्यबळ, कूळ इत्यादीची चौकशी केली तेव्हा समजलं की दोघंही सर्व बाबतीत समान आहेत–कोणीही कोणापेक्षा कमी नाही. मग काशीराजाच्या सारथ्यानं विचार केला की दोघांपैकी जो अधिक चारित्र्यसंपन्न असेल त्याचाच रथ पुढे जाईल. त्यानं कोशलराजाच्या

सारथ्याला विचारलं, ''तुझ्या राजाचं चारित्र्य कसं आहे?'' कोशलराजाच्या सारथ्यानं उत्तर दिलं, ''फारच छान चारित्र्य आहे आमच्या राजेसाहेबांचं! ऐक...


कठिणाशी कठीण अन् मवाळांशी मवाळ
सज्जनांशी सौजन्य, पण दुर्जनांशी वक्र
कोशलराजाची नीती अशी आहे निपुण
थोडक्यात सांगणं आहे महाकठीण!
रथ तुझा बाजूला हटव, माझा रस्ता सोड
लवकर कर हे काम मित्रा, हट्ट तुझा सोड!''

काशीराजाच्या सारथ्यानं विचारलं, ''का रे बाबा, तू कोशलराजाच्या सगळ्या गुणांचं वर्णन केलंस?'' तो म्हणाला, ''हो!'' काशीराजाचा सारथी म्हणाला, ''जर हे सर्व गुण असतील तर दोष कशाला म्हणतात?'' तो म्हणाला, ''ठीक आहे, हे जर दोष असतील तर तुमच्या राजाचे गुण तरी ऐकव. आम्ही देखील ऐकू.''


काशीराजाच्या सारथ्यानं म्हटलं,

''ऐक—क्रोधाला प्रेमानं जिंकतात,
दुष्टाला सौजन्यानं आपलंसं करतात,
कंजूष माणसाला दानशूरपणानं वश करतात.
असत्यावर सत्यानं विजय मिळवतात
असे आहेत आमचे काशीराजे!''

हे ऐकून कोशलराजे आणि त्यांचा सारथी विचार करू लागले की खरंच, जो वाईटाशी वाईट वागतो तो कसा बरं मोठा असू शकेल? जो दुष्ट माणसाशी सुद्धा चांगलं वागेल आणि नम्रपणानं त्याचा दुष्टपणा नाहीसा करील त्यालाच



मोठं मानावं लागेल. त्यांनी काशीराजांच्या मोठेपणाची मनापासून प्रशंसा केली. दोघंही रथातून उतरले. त्यांनी काशीराजांना प्रणाम केला आणि आपला रथ मागे वळवून काशीराजांच्या रथाचा मार्ग मोकळा केला. दोन्ही राजांची आपआपसात बोलणी झाली. मग दोघंही आपापल्या राजधान्यांकडे निघून गेले.





# मोठं काय?

एका मोठ्या राजाच्या दरबारात एक ब्राह्मण होता. ब्राह्मण विद्यासंपन्न तर होताच पण अत्यंत सुशील होता. हिंसा, चोरी, खोटं बोलणं अशा दुर्गुणांपासून तो नेहमी दूर राहत असे. तो राजाचा आवडता होता. राजा त्याला खूप आदरानं वागवत असे. लोकांचीही त्याच्यावर श्रद्धा होती, भक्ती होती. एक दिवस त्यानं विचार केला—'राजा माझा इतका आदरसत्कार कशासाठी करीत असेल? माझ्या जातीमुळे, कुळामुळे, की देश, विद्या, चरित्र यापैकी कोणत्या एका गोष्टीसाठी? चला, एक दिवस याची परीक्षाच पाहूया.'

राजाचा एक कर्मचारी होता. राज्यात रोज जो काही पैशांचा व्यवहार होत असे त्याचा हिशेब ठेवण्याचं काम तो करीत असे. त्यालाही ब्राह्मणाविषयी अतिशय आदर वाटत असे. एक दिवस ब्राह्मण दरबारात हजेरी लावून घरी परत चालला होता. कर्मचाऱ्यानं लोकांना वाटप करण्यासाठी जे पैसे सांभाळून ठेवले होते, त्यातले काही पैसे त्याची नजर चुकवून ब्राह्मणानं पळवले आणि गुपचूप निघून गेला. कर्मचाऱ्यानं हे पाहिलं, पण ब्राह्मणाविषयी मनात आदर आणि भक्ती असल्यामुळे तो काहीच बोलला नाही.

एक दिवस पुन्हा एकदा ब्राह्मण पैसे चोरून निघून जात असताना राजाच्या सैनिकांना संशय आला आणि ते "चोर, चोर" म्हणून ओरडू लागले. चहूकडून माणसं धावून आली आणि त्यांनी ब्राह्मणाला पकडलं. ते म्हणू लागले, "बाबाजी, इतके दिवस तर अगदी चारित्र्यवान आणि सुशील म्हणवून घेत होतात. चला आता राजाकडे!" ब्राह्मणाला पकडून ते राजाकडे घेऊन गेले आणि सारी हकीगत राजाच्या कानावर घातली. राजाला अतिशय वाईट वाटले. तो म्हणाला, "अरे ब्राह्मणा, तू इतका दुष्ट आहेस? वाईट आहेस?" राजानं त्याला योग्य ती शिक्षा देण्यास फर्मावलं.

ब्राह्मण म्हणाला, "महाराज, मी चोर नाहीये." राजानं विचारलं, "चोर नाहीस तर हे कृत्य कसं केलंस?" तेव्हा ब्राह्मणानं सारं काही नीट उलगडा करून सांगितलं, "महाराज, आपण माझ्यावर खूप प्रेम करीत होतात, माझा इतका आदरसत्कार करीत होतात. लोकांचीही माझ्यावर श्रद्धा होती. तेव्हा मी विचार केला, की हा सारा

मानसन्मान मला कशासाठी मिळतो आहे? माझ्या जातीमुळे, कुळामुळे, विद्येमुळे, देशामुळे की चारित्र्यामुळे? महाराज, याची परीक्षा घेण्यासाठीच मी आपल्या धनाची चोरी केली. आता मला समजून चुकलं आहे, की मला जो काही मानसन्मान मिळतो आहे तो केवळ चांगल्या चारित्र्यामुळे मिळतो आहे—जात, कूळ, देश अथवा विद्येसाठी नाही."

त्यानंतर ब्राह्मण संन्यास घेऊन तप करण्यासाठी निघून गेला.





# मंत्र-तंत्र

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. एका राज्यात एका गृहस्थाला पुत्रलाभ झाला. आईबापांनी त्याचं नाव ठेवलं 'कुमार.' कुमार मोठा झाल्यावर त्याचं लग्न झालं. काही काळानंतर त्याला मुलं झाली, तीही मोठी झाली.

कुमार अतिशय सज्जन होता. कधी जीवहत्या करीत नसे, दुसऱ्याच्या वस्तूला हात लावीत नसे, खोटं बोलत नसे, नशापाणी करीत नसे आणि परस्त्रीला मातेसमान मानीत असे.

कुमार ज्या गावात राहत असे ते अगदी छोटंसं गाव होतं—फक्त तीस कुटुंबांचं! एके दिवशी सर्व तीसही कुटुंबप्रमुखांची एकत्र सभा होती. पण गावात अशी एकही जागा नव्हती की जिथे सर्वजण एकत्र जमू शकतील. कुमार त्या तीस जणांपैकी एक होता. सर्वांबरोबर एका ठिकाणी पोहोचल्यानंतर त्यानं एक जागा पाहून ती झाडून झटकून साफ केली. ती जागा साफ होताच एक मनुष्य तिथे येऊन उभा राहिला. काही न बोलता कुमार दुसरी जागा स्वच्छ करू लागला. ती साफ झाल्यावर आणखी एक माणूस तिथे येऊन टपकला. अशा तऱ्हेनं एक-एक करून त्यानं सर्व जणांसाठी जागा स्वच्छ करून दिली.

ज्याचं जे काही काम होतं ते पार पडल्यानंतर सर्वांनी तिथे एक ओटा तयार केला. सवडीप्रमाणे ते सगळे ओट्यावर जमत, गप्पागोष्टी करीत, हास्याविनोद करीत. गावात कोणी पाहुणा आला तर तोही त्या ठिकाणी जात असे. अशा प्रकारे दिवस जात होते.

काही दिवसांनंतर त्यांनी तिथेच एक छोटंसं घर बांधलं. तिथे बसण्यासाठी चटया वगैरे आवश्यक गोष्टींची जमवाजमव यथावकाश केली. ज्याला जसा वेळ होईल त्याप्रमाणे तो तिथे येई, गप्पाटप्पा करी. पाहता पाहता सर्वजण त्याचं अनुकरण करू लागले.

पहाटे लवकर उठून ते आपापली घरची कामे आटोपून खुरपं, कोयता, कुदळ बिदळ घेऊन घराबाहेर पडत. वाटेत एखादा दगड, एखादं झाड पडलं असेल तर ते

बाजूला करीत. गाडीला किंवा माणसांना येता जाता ठेच लागेल असं वाटलं तर तो दगड बाजूला हटवीत. झाड वाटेत असेल तर त्याच्या फांद्या छाटून टाकीत. जमीन सपाट करीत. गरज पडेल त्याप्रमाणे पूल बांधीत, तलाव खोदीत आणि ज्याला शक्य असेल तो दानधर्मही करीत असे. कुमारच्या सहवासामुळे गावातले सारेच लोक खूप चांगले, सद्गुणी बनले होते.


असेच दिवस जात होते. गावच्या सरपंचाला वाटलं की 'हा काय प्रकार आहे? पहिल्यांदा तर गावकरी लबाड होते. दारू पीत असत. दारूमुळे थोडीफार कमाई होत असे. लोक दारू पिऊन गोंधळ घालीत आणि त्याबद्दल त्यांना दंड केला की काही पैसे मिळत. पण आता या कुमारमुळे सारं गाव सुधारलं आहे. कोणी दारूला शिवत नाही. मारपीट, हिंसा करीत नाही. सगळे अगदी सज्जन बनले आहेत. थांबा जरा, बघतोच त्यांच्याकडे! राजाकडे तक्रार करतो, मग बघतो किती सज्जन राहतात ते!'

सरपंच राजाकडे जाऊन म्हणाला, "महाराज, गावातले सगळे लोक चोर आहेत. त्यांचा उपद्रव फारच वाढला आहे. जर त्यांचा काही बंदोबस्त केला नाही तर अवघड आहे." राजानं चोरांना दरबारात हजर करण्याची आज्ञा दिली. सरपंचानं सर्वांना बांधून राजापुढे हजर केलं आणि राजाला म्हणाला, "महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणे




सर्वांना हजर केलं आहे.'' राजानं त्यांच्यापैकी कुणाचंही म्हणणं ऐकून घेतलं नाही. अचानक आज्ञा दिली, ''जा, त्यांना हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारा.''

राजवाड्याच्या विस्तीर्ण पटांगणात सर्व जणांना बांधून झोपवून ठेवलं. एक मोठा हत्ती मागवला. या लोकांमध्ये कुमारही होता. त्यानं सर्वांना उद्देशून म्हटलं, ''मित्रांनो,



राजा आपल्यावर अन्याय करतो आहे ही गोष्ट खरी आहे. हेही नक्की, की आता आपण हत्तीच्या पायाखाली तुडवले जाणार! पण तरीही तुम्ही राजावर राग धरू नका. ज्यांप्रमाणे आपण स्वतःच्या शरीरावर प्रेम करतो, तितकंच प्रेम आपण राजाच्या शरीरावर (म्हणजेच राजावर) केलं पाहिजे.'' सर्व जणांनी कुमारचं सांगणं ऐकलं.

राजाची माणसं हत्तीला घेऊन त्या लोकांवर चालून आली, पण काही केल्या हत्ती पुढं जाईना. तो ओरडून मागे वळला आणि पळू लागला. दुसरा हत्ती आणवला. तोही पुढे जाऊ शकला नाही. मग तिसरा, चौथा...असं करत करत अनेक हत्ती आणवले, पण एकही पुढे गेला नाही. सगळे मागे वळून धावत सुटले.



राजा म्हणाला, ''मला वाटतं की यांच्या हातात काहीतरी जडीबुटी आहे. तपासा रे यांचे हात!'' सैनिकांनी खूप शोध केला, पण त्यांना काहीच मिळालं नाही. ते म्हणाले, ''नाही महाराज, यांच्या हातात काहीच नाही.'' राजा म्हणाला, ''मग नक्कीच यांना काही मंत्र-तंत्र अवगत असले पाहिजेत.'' त्यानं त्या लोकांना विचारलं, ''का रे, तुम्ही

काही मंत्र-तंत्र जाणता का?" त्यांनी उत्तर दिलं, "महाराज, आम्हाला कोणताही मंत्र माहीत नाहीं. आम्ही तीस जण प्राणीहत्या करीत नाही, दुसऱ्याच्या वस्तूला हात लावीत नाही. खोटं बोलत नाही, दारू पीत नाही. सर्वांशी मैत्री ठेवतो. शक्य असेल तर दानधर्म करतो. ओबडधोबड जमीन सपाट करतो. सामान्य लोकांसाठी तलाव खणतो, घरं बांधतो. महाराज, जर आम्हाला कोणता मंत्र माहीत असेल तर तो हाच मंत्र आहे. इतर कोणताही मंत्र नाही."

त्यांचं बोलणं ऐकून राजा संतुष्ट झाला. त्यानं दुष्ट सरपंचाचा जमीनजुमला काढून घेतला आणि त्या तीस लोकांना त्यांचा गाव आणि एक मोठा हत्ती बक्षीस दिला.



Lasertypeset at Ess Ess Enterprises, New Delhi-110 05
and perited at Jupiter Offset Works, Delhi-110 032



Printed at : Jupiter Offset Works, Shahdara, Delhi-110032





आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी (1907-1979) यांचे साहित्य सर्वांना सुपरिचित आहे. परंतु त्यांनी मुलांसाठीही कथा लिहिल्या आहेत हे फारच थोड्या लोकांना माहीत असेल. मुलांनाही त्यांच्या लेखणीचा परिचय व्हावा या उद्देशाने नॅशनल बुक ट्रस्टने आचार्य द्विवेदी यांच्या या बालकथा प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या कथा वाचताना पंचतंत्र, हितोपदेश, आणि जातककथांची आठवण होते. आम्हाला असा विश्वास आहे, की या कथा वाचून नव्या पिढीला निश्चितपणे फायदा होईल.





रु. 10.00 ISBN 81-237-3532-4

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया